# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-2557266/46 **कार्यासन दु. क्र.** 0712-2557266

**E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in** **Website: rdtenagpur.org.in**

**अत्यंत महत्वाचे**

**क्र.तशिस/विकाना/शैवि-1/रसुस/2020/** 364

**दिनांक:-** 24 JAN 2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर जिल्हा, नागपूर.

विषय:- जिल्हा रस्ता सुरक्षेच्या संदर्भात मा. नितिनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, परिवहन महामार्ग तथा सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग विभाग, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीच्या अनुषंगाने पूर्व तयारीबाबत.

संदर्भ:- प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर) यांचे दि. 24/01/2020 रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मा. नितिनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, परिवहन महामार्ग तथा सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग विभाग, भारत सरकार यांनी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे गठन केलेली असून ते स्वत: समितीचे अध्यक्ष आहे. मा. जिल्हाधिकारी, नागपूर हे जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे सदस्य-सचिव असून त्यांना **दि. 28/01/2020 रोजी दुपारी 4.00 वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे सभेचे आयोजन केले आहेत** व त्यामध्ये त्यांचा नागपूर जिल्हातील सर्व पदवी अभियांत्रिकी व पदवीका अभियांत्रिकी (तंत्रनिकेतन) महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सदरहू बैठकीस उपस्थित राहण्याबाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, नागपूर जिल्हातील सर्व पदवी अभियांत्रिकी व पदवीका अभियांत्रिकी (तंत्रनिकेतन) महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सदरहू बैठकीस न चुकता उपस्थित राहावे.

**सहपत्र:-** संदर्भिय पत्र

**(डॉ. राम निबुदे)**
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

**प्रत:-** प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, गिरीपेठ पोस्ट ऑफीससमोर, अमरावती रोड, नागपूर (शहर) यांना माहितीकरीता सादर.

जा.क्र.______/र.सु.स./का ३/प्रापका/नाग(श)/२०२०
प्रादेशिक परिवहनकार्यालय,नागपूर (शहर)
गिरीपेठ पोस्ट ऑफीससमोर, अमरावती रोड, नागपूर.
e-mail-mh31@mahatranscom.in
फोन नं. ०७१२-२५६१६१८(फॅक्स)/२५६०७८१
दिनांक : 24-01-2020

प्रति,

मा. उपसंचालक,
उच्च तंत्रशिक्षण विभाग, नागपूर

२.

**विषय :-** जिल्हा रस्ता सुरक्षेच्या संदर्भात मा. नितीनजी गडकरी, केंद्रिय मंत्री, परिवहन महामार्ग तथा सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग विभाग, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीच्या अनुषंगाने पूर्व तयारीबाबत.

**संदर्भ :-** सदस्य-सचिव, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे निर्देश दिनांक २४.०१.२०२०.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्र सरकारने मा. खासदार (लोकसभा) यांच्या सांसदिय क्षेत्राकरीता रस्ता सुरक्षा समितीचे गठण केलेले आहे. मा. नितीनजी गडकरी, केंद्रिय मंत्री, परिवहन, महामार्ग तथा सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, भारत सरकार हे या समितीचे अध्यक्ष आहेत. मा. सदस्य-सचिव, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार **दिनांक २८.०१.२०२० रोजी दुपारी ४.०० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेस नागपूर शहरातील उच्च तंत्रशिक्षण कॉलेजच्या प्राचार्यांना उपस्थित राहण्यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे निर्देश आहेत.

त्या अनुषंगाने सबब, आपणास विनंती करण्यात येते की, दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या सभेस नागपूर शहरातील उच्च तंत्रशिक्षण कॉलेजच्या प्राचार्यांना उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून निर्देश देण्यात यावे व त्याबाबत या कार्यालयास अवगत करावे, ही विनंती.

24/1

प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नागपूर (शहर)

प्रत -

१. मा. सुधीर देऊळगावकर, विशेष कार्य अधिकारी, मा. केंद्रिय मंत्री, परिवहन, महामार्ग तथा सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग विभाग, भारत सरकार यांना माहितीस्त्व.

२. मा. सदस्य-सचिव, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर.

All Poly व Engg चे प्राचार्य यांना कळवावे व श्री. उके सर यांनी उपस्थित राहावे
24.01.20